महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : आठवी

# लेखन : स्व-आभिव्यक्ती

**अनुभवलेखन**

१) शालेय स्पर्धेत तुमचा संघ अटीतटीने खेळला, मात्र दुसरा संघ जिंकला. तेव्हाच्या खेळाचे, वातावरणाचे, भावनांचे, विचारांचे वर्णन तुझ्या शब्दांत लिही.

२) तुझ्या वर्गाची सहल ओढ्याकाठच्या जैवविविधतेचे निरीक्षण करण्यासाठी गेली होती. त्या सहलीविषयी लिही.

३) सुटीच्या दिवशी तुझा मित्र/ मैत्रीण गायीला रानात चरायला नेतो/नेते. तूही तिच्याबरोबर/त्याच्याबरोबर एकदा गेलास/गेलीस तेव्हा तेथे तुम्ही काय काय केले, वातावरण कसे होते,तुम्हाला कसे वाटले, याविषयी लिही.

४) तू संध्याकाळी टेकडीवर जाते /जातो याविषयी तुझा अनुभव लिही

५) रंगपंचमी आली अन मुलांनी फुलांचे रंग करायला घेतले.दुकानातील रंग नाही घ्यायची असं ठरलं.मुलांनी असं का ठरवलं असं तुला वाटतं ?

**संवाद**

१) तुझ्या मित्राच्या/ मैत्रीणीच्या थोरल्या बहिणीचे लग्न होऊन ती सासरी गेली. मित्राला/मैत्रीणीला फार एकटे वाटत होते. त्यावेळी तुमच्या दोघांत/दोघींत झालेला संवाद लिही.

२) शेतजमीन आणि नांगर यांच्यातला संवाद लिही.

३) नात आजीला मोबाईलविषयी समजावून सांगत आहे.आजी - नात यांच्यातील संवाद लिही.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : आठवी

---

**वैचारिक लेखन**

१) गावात आठवीपर्यंतची शाळा आहे. चांगले गुण मिळाले तरी गावातील मुलींना पुढील शिक्षणासाठी दुसऱ्या गावातील शाळेत पाठवायचे नाही असे पालकांनी ठरविले आहे.या प्रसंगाचे वर्णन, मुलींच्या मनातील विचार, पालकांचे मत, तुला याविषयी काय वाटते हे लिही.
२) गावकऱ्यांच्या सहमतीशिवाय गावाजवळील डोंगराचा काही भाग कंत्राटदाराने घेतला आहे व सुरूंग लावण्याचे काम सुरू झाले आहे. शेतजमीन, घरे, गुरेवासरे, पक्षी, माणसे यांच्यावर होणाऱ्या परिणामांबाबत लिही. गावकऱ्यांची सहमती न घेता हे घडले त्याबाबत तुलाकाय वाटते ते लिही.
३) 'दुष्काळ' कशाकशाचा असतो? सविस्तर स्पष्ट कर. तुला ठाऊक आहे तेवढे लिही.

**पत्रलेखन**

१) शहरात राहणाऱ्या तुझ्या भावाला सुट्टीसाठी तुझ्या गावी बोलावण्यासाठी पत्र लिही.
२) आवडत्या लेखकाला पत्र लिहून तुमच्या शाळेत येण्याची विनंती कर.
३) शाळेच्या ग्रंथालयासाठी शब्दकोष मागण्याचे पत्र प्रकाशांना लिही.

**अहवाल**

१) गावाजळील टेकडीवर गावकऱ्यांनी वृक्षारोपण केले. त्या कार्यक्रमाचा अहवाल तुझ्या शब्दांत लिही.
२) तुझ्या शाळेतल्या क्रीडास्पर्धांचा अहवाल तुझ्या शब्दांत लिही.
३) शाळेच्या स्नेहसंमेलनाचा अहवाल तुझ्या शब्दांत लिही.
४) अंगणवाडीत एकही कुपोषित बालकनाही म्हणून पाहुण्यांनी भेट दिली. व गावकऱ्यांचे कौतुक केले. या प्रसंगाचा अहवाल लिही.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : आठवी

---

**मुलाखत**

१) शहरात उच्चशिक्षण घेऊनही गावकऱ्यांसाठी काम करण्यासाठी गावात परत आलेल्या श्री. धनसिंग पावरा यांची मुलाखत लिही.

२) आपल्या गावात सुतारकाम, गवंडीकाम, लोहारकाम करणाऱ्या कोणत्याही एका कारागिराची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन तुझ्या शब्दांत लिही.

**वर्णन**

१) वर्षभरामध्ये शेताची जी वेगवेगळी रूपे दिसतात आणि शेतात जी वेगवेगळी कामे केली जातात त्याचे वर्णन तुझ्या शब्दांत लिही.

**व्यक्तिचित्र**

१) दिसणे, वागणे, स्वभाव, इतर वैशिष्ट्ये या मुद्द्यांना धरून तुला आवडणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचे वर्णन लिही.

२) तुमच्या बकरीचे, कुत्र्याचे, मांजराचे किंवा बैलाचे वर्णन लिही.